महा मेट्रो

PUNE METRO

**पुणे मेट्रो ट्रेनच्या निरीक्षणासाठी श्री. जनक कुमार गर्ग, मेट्रो रेल संरक्षा आयुक्त (CMRS) यांची वनाज डेपो येथे पाहणी**



पुणे मेट्रोमध्ये वनाज ते रामवाडी व पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या दोन मार्गिका आहेत. यांची लांबी ३३ किमी असून यांत एकूण ३० स्थानके आहेत. या प्रत्येक मार्गिकेसाठी स्वतंत्र अश्या कोच (डब्बे) मेंन्टेनन्स डेपो उभारण्यात येत आहेत. वनाज ते रामवाडी या मार्गिकेमध्ये कोथरूड कचरा डेपो व पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकेमध्ये कृषी महाविद्यालय येथे कोच मेंन्टेनन्स डेपोची उभारणी करण्यात येत आहे. पुणे मेट्रोसाठी एकूण ३ डब्यांच्या ३४ मेट्रो ट्रेन वापरण्यात येणार आहेत. पुणे मेट्रोसाठी या ट्रेन टिटागढ-फिरेमाहि कंपनी बनविणार आहे. पुणे मेट्रोसाठी बनविण्यात येणाऱ्या ट्रेन ॲल्युमिनिअम या हलक्या धातूपासून बनविण्यात येणार आहेत. भारतात पहिल्यांदाच अश्या प्रकारच्या वजनाने हलक्या ट्रेन बनविण्यात येत आहेत.



मेट्रोसाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रेनचे सखोल निरीक्षण मेट्रो रेल संरक्षा आयुक्त (CMRS) यांच्या द्वारे केले जाते. मेट्रो ट्रेनचा प्रत्यक्ष प्रवासी वाहतुकीसाठी वापर करण्यासाठी मेट्रो रेल संरक्षा आयुक्त यांचे प्रमाणपत्र आवश्यक असते. मेट्रो रेल संरक्षा आयुक्त यांच्या निरीक्षणाआधी रेल्वेचे रिसर्च डिझाईन व स्टँडर्ड ओर्गनाझेशन (RDSO), लखनऊ येथे सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागते. त्याचबरोबर रेल्वे मंत्रालय देखील विविध बाबींची पूर्तता केल्यानंतर मेट्रो रेल संरक्षा आयुक्त यांना निरीक्षणासाठी पाचारण करण्यात येते. नुकत्याच RDSO च्या तांत्रिक अधिकाऱ्यांकडून टिटागढ कंपनीने बनविलेल्या ट्रेनचे सखोल परीक्षण व विविध तांत्रिक चाचण्या घेण्यात आल्या. RDSO आणि रेल्वे मंत्रालय यांच्या परवानगीनंतर मेट्रो रेल संरक्षा आयुक्त यांचे निरीक्षण हा शेवटचा टप्पा असतो.



मेट्रो रेल संरक्षा आयुक्त, जनक कुमार गर्ग यांनी आज दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजी वनाज डेपो येथे मेट्रो ट्रेनचे सखोल निरीक्षण केले. यामध्ये मेट्रोची ब्रेकिंग प्रणाली, ट्रॅक्शन प्रणाली, सिग्नल प्रणाली, एअर कंडिशनर, दूरसंचार प्रणाली व प्रवासी सूचना प्रणाली यांचे सखोल निरीक्षण करण्यात आले. यावेळी श्री. अतुल गाडगीळ, संचालक (कार्य), श्री. विनोद अग्रवाल, संचालक (सिस्टीम) व श्री देवेंद्र मिश्रा, कार्यकारी संचालक (रोलिंग स्टॉक) हे उपस्थित होते